**<u>पुणे महानगरपालिकेच्या कामा करिता</u>**

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
दिनांक :१/६/२०१७

पुणे महानगरपालिका
✷ सूचना ✷
(महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे परिशिष्ठ भाग २ मधील
नियम क्रं.१(डी) (एच) व (आय) अन्वये)

**कार्यपत्रिका क्रमांक – ८**

**(खास सभा)**

**मा.राजाभाऊ बराटे, मा. सौ. मंजुषा नागपुरे, मा.सौ.कविता वैरागे , मा. योगेश समेळ, मा.सौ.निलीमा खाडे व मा. हरिदास चरवड या स्थायी समितीच्या ६ ( सहा ) मा. सभासदांकडून दिनांक १/६/२०१७ रोजी लेखी मागणी (रिक्वीझिशन) आल्यावरुन पुणे महानगरपालिकेची विशेष (खास ) सभा बुधवार, दिनांक ७/६/२०१७ रोजी दुपारी ३:०० (तीन) वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृहात (मनपा सभागृहात) भरेल.**

सदर सभेत खालील विषयांचा विचार होईल.

**<u>विषय क्र. ६५</u>**

संदर्भ:– १) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक २१७ दिनांक १७/०५/२०१६
२) मा.मुख्य सभा ठराव क्रमांक ९९ दिनांक ०८/०६/२०१६
३) मा.मुख्य सभा ठराव क्रमांक ८०२ दिनांक २१/१२/२०१६
४) मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुले/६४ दि. ३०/५/२०१७ चे पत्र.
५) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १५६, दिनांक ३०/०५/२०१७

----

मा.महा.आयुक्त यांनी दिलेली कारणे व केलेली शिफारस विचारात घेवून –

पुणे महानगरपालिकेच्या २४ X ७ समान पाणीपुरवठा योजने करीता आवश्यक कर्ज/कर्जरोखे उभारणे व या कामासाठी तांत्रिक सल्लागार/संस्था यांची नेमणूक करणेसाठी खालील बाबीस मान्यता द्यावी अशी मा.मुख्य सभेकडे शिफारस आहे.

१) २४X७ समान पाणीपुरवठा प्रकल्पासाठी र.रु.२२६४ कोटी पर्यंत कर्ज/कर्जरोखे उभारणे आवश्यक आहे. तथापि प्रत्यक्ष प्रकल्प उभारणीसाठी यापेक्षा कमी रकमेची आवश्यकता असल्यास त्याप्रमाणे अथवा अधिक रकमेची आवश्यकता असल्यास अतिरिक्त २०% पर्यंत कर्ज/कर्जरोखे उभारणेस मान्यता मिळणेस

२) २४X७ समान पाणीपुरवठा योजनेच्या अंमलबजावणीसाठी लागणा–या निधीचा आर्थिक आराखडयास (मा.महा.आयुक्त यांचे विषयपत्रासोबत जोडलेले परिशिष्ट २)

३) सदर प्रक्रियेमध्ये इतर अनेक मध्यस्थांकडून (Other Intermediaries to the Issue ) विविध कामे करुन घेणेसाठी त्यांची नेमणूक करणे व त्यांचा मुशाहिरा आदा करणेस.

४) जेएनएनयुआरएम अंतर्गत स्विकारलेल्या सुधारणांप्रमाणे पुणे महानगरपालिकेने २००६–२००७ पासून National Municipal Accounts Mannual चा स्विकार करुन द्विलेखा नोंद पद्धतीनुसार लेखे/ताळेबंद व जमाखर्च पत्रक आर्थिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर लवकरात लवकर तयार करुन त्याचे लेखापरीक्षण करुन घेणेस व त्यासाठी आर्थिक वर्ष झाल्यानंतर सदर वर्षाच्या शिल्लक तरतूदी आर्थिक वर्ष अखेरीस त्वरीत व्यपगत करुन ३१ मार्च नंतर किंवा आर्थिक वर्ष संपल्यानंतर लगेच पुढील तीन महिन्यामध्ये हिशोबाचे अंतिमीकरण करणे आवश्यक होईल.

५) प्रत्येक टप्याटप्याने उभारलेल्या कर्ज रोख्यांची परत फेड करताना देय असलेल्या रकमेच्या दोन पट रक्कम ही आगाऊ शिल्लक रक्कम मालमत्ता कर, पाणीपटटी या महसुली उत्पन्नाचे स्त्रोतातून ESCROW खात्याकडे वर्गीकरण करणे व परतफेड देय रक्कम व्यतिरिक्त रक्कम मनपा निधी मध्ये वर्ग करणेस, तसेच परतफेडीच्या रकमेइतका मालमत्ता कर व पाणीपटटी कर तारण ठेवणेस.

६) २४X७ समान पाणीपुरवठा प्रकल्पासाठी कर्ज/कर्जरोखे उभारणी करताना सदर प्रकल्पाचे काम हे पुढील ५ वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने पूर्ण करावयाचे असल्याने एकाच वेळी निधीची आवश्यकता नसल्याने

त्या आर्थिक वर्षामध्ये होणारे काम व त्यासाठी आवश्यक असणा-या निधीची गरज यांचे नियोजन करुन त्यानुसारच आवश्यक त्या रकमेपर्यंत कर्ज/कर्जरोखे स्वरुपात निधी उभारणेस, त्यासाठी आवश्यक त्या Structured Payment Mechanism नुसार कामकाज करणेस, वरीलप्रमाणे कामकाजातील आर्थिक सुधारणा करणेस,सदर प्रक्रियेमध्ये होणारे आवश्यक असलेले करार व त्या अनुषंगाने होणारी सर्व तदनुषंगिक कामे व यासाठी होणारा खर्च, तसेच संदर्भांकित कर्जरोख्यांच्या मान्यतेसाठी मे.राज्य शासनाकडे करावा लागणारा पाठपुरावा इ.साठीचे सर्व अधिकार मा.महापालिका आयुक्त यांना देणेस.

७) सदर कर्जरोखे टप्प्याटप्याने उभारतांना प्रत्येक टप्प्यात उभारलेले कर्ज हे समान/अनुक्रमानुसार परत फेडीच्या हक्काच्या अधिन राहून (each series ranking pari pass with each other) ने परतफेड केली जाईल.

८) प्रत्येक टप्प्यात उभारलेल्या कर्जरोख्यांची परतफेड मुदत ही कर्जरोखे उभारलेल्या दिनांकास जास्तीतजास्त १५ वर्षापर्यन्त असेल. परंतु सदर कर्जरोख्यांची परतफेड १५ वर्षापूर्वी करणे मनपाच्या हिताच्या दृष्टीचे आवश्यक असल्याने परतफेड करणेस.

नगरसचिव कार्यालय,
पुणे महानगरपालिका
शिवाजीनगर पुणे ४११००५
दिनांक :-१/६/२०१७

**मा.महापौर यांचे आज्ञेवरुन**

**नगरसचिव,**
**पुणे महानगरपालिका**

**(टीप :-प्रस्तुत कार्यपत्रिकेवरील विषयांची कागदपत्र (डॉकेट) मा.नगरसचिव यांच्या कार्यालयात वाचण्यासाठी ठेवली आहेत.)**